हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी- रत्नागिरी, लांजा

# हेरीटेज प्रयोगवार्ता

## प्राथमिक आश्रमशाळा, जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी

१५ जून ते ३१ ऑक्टोबर २०२४


**संस्थापक- संतोष कांबळे**
संपर्क: ९३७३३४६२१३

**अध्यक्ष- मा.अपर्णा पवार**
संपर्क: ७६६६०४७७३३





## प्रत्येक्ष अनुभवाचे शिक्षण देणारी शाळा...

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संस्थेच्या जावडे ता.लांजा या ठिकाणी ३ शाळा आहेत. १. न्यू इंग्लिश स्कूल जावडे (इ.८ वी ते १० वी) २. प्राथमिक आश्रमशाळा जावडे (निवासी शाळा) (इ.१ ली ते ४ थी ) व ३. माध्यमिक आश्रमशाळा जावडे (निवासी शाळा) (इ.५ वी ते १० वी) या तीनही शाळा मिळून या शिक्षण संकुलात एकूण ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही सर्व मुले-मुली समाजातील वंचित, गरीब व कष्टकरी कुटुंबातील आहेत. त्यापैकी ३०० विद्यार्थी निवासी राहून शिक्षण घेत आहेत. या सर्व मुला-मुलींना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळावं यासाठी संस्था प्रयत्नशील आहे.

हेरीटेज प्रयोगभूमीत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना चागल्या दर्जाचे शिक्षण मिळावे, त्यांना सर्व सोयी-सुविधा मिळाव्यात, ग्रामीण भागात शिक्षण घेत असताना देखील त्यांच्या शिक्षणामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहू नये यासाठी संस्थेच्या अध्यक्षा अपर्णा पवार आग्रही असतात.

प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत वर्ग आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शाळेची पटसंख्या ८४ इतकी आहे.

शाळेस शासनाची मान्यात ७० विद्यार्थ्यांची असून या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी प्रवेश हाऊस फुल झालेला आहे. शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना प्रत्येक अनुभव विद्यार्थ्यांना दिला जातो. यासाठी विविध उपक्रम शाळेत राबविले जातात. शेती, ग्रामपंचायत, पोस्ट ऑफिस अशा विविध ठिकाणी विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित करण्यात येतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध बाबीचे स्वत: निरीक्षण करता येते, अनुभव घेता येतो.

विद्यार्थ्यामध्ये विविध कौशल्य विकसित होण्यासाठी चित्रकला, कार्यानुभावातील कागदकाम, मातीकाम, वत्कृत्व स्पर्धा, कविता गायन, मैदानावरील विविध खेळ अशा शिक्षणपूरक उपक्रम देखील शाळेत आयोजित केले जातात. विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती निर्माण व्हावी यासाठी शाळेत समुपदेशक, पोलिस, वकील, डॉक्टर, इंजिनियर अशा व्यक्तीच्या भेटी आयोजित करण्यात येतात.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, विद्यार्थ्यांना समाजात आदर्श जीवन जगताना शिक्षणाचा उपयोग व्हावा, असे अनुभवाचे भविष्यवेधी शिक्षण आमच्या प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेत दिले जाते.


हेरीटेज प्रयोगवार्ता...

साजरे करण्यात आलेले उपक्रम

द्वितीय सत्रातील नियोजन

यशोगाथा

ऋणनिर्देश

गरज आपल्या मदतीची..

प्राथमिक आश्रमशाळा टिम



# पटनोंदणी मोहीम शैक्षणिक वर्ष २०२४-२५

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा या निवासी शाळेत दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२४ मध्ये देखील समाजातील शिक्षणापासून वंचित, गरीब व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी संस्थेचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले. समाजात कोणत्याही कुटुंबातील मुल शिक्षणापासून वंचित राहू नये, सर्व स्तरातील मुला-मुलींना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळावं यासाठी हेरीटेज नेहमीच प्रयत्नशील असते. पटनोंदणी मोहिमेचे नियोजन करताना सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांवर जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या.

पटनोंदणीसाठी मुख्य करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात आले. मुंबई, पुणे, कोल्हापूर यांसारख्या महानगरांमध्ये ज्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना गरज आहे, अशा ठिकाणी सर्वेक्षण करण्याचे ठरले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यामधून इ.१ ली ते ४ थी पर्यंत एकूण ८४ विद्यार्थ्यांचा हाऊस फुल प्रवेश शाळेमध्ये निश्चित करण्यात आला. ही सर्व मुले-मुली ह्या समाजातील अठरापगड जातींतली आहेत. शाळेमध्ये प्रवेश देताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. हे सर्व विद्यार्थी याठिकाणी गुण्या-गोविंदाने राहतात. संस्थेकडून सर्व मुला-मुलींना सर्व चांगल्याप्रकारच्या सोयी-सुविधा पुरविल्या जातात.







## कार्यानुभव- कागदापासून फुले तयार करणे.

बालमानसशास्त्रात सांगितल्याप्रमाणे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळून नानिर्मितीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यानुभव विषयाची गरज भासते. नवनिर्मिती व शोधकवृत्तीमुळे ह्या मुलांना पुढे इंजिनियर, वैज्ञानिक किंवा तत्सम चांगले करिअर साकारण्यास मदत होईल, अशाप्रकारचे नवनवीन विचार व नवनवीन कल्पना समोर ठेऊन हेरीटेज शाळांमध्ये विविध नवनवीन उपक्रमांची अंमलबजावणी करत असते.

सोमवार दि.१२/०८/२०२४ रोजी आमच्या हेरीटेज कल्चर आर्ट अँड डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेत संस्थाप्रमुख संतोष कांबळे सर यांच्या संकल्पनेतून व सहकार्यातून कार्यानुभव विषयांतर्गत विद्यार्थ्यांना कागदापासून फुले तयार करायला शिकवण्यात आले. या उपक्रमात रसिका संतोष आयरे व प्रज्ञा संतोष आयरे यांनी विद्यार्थ्यांना फुले तयार करायला शिकवली. सर्व विद्यार्थ्यांनी टिटेंड पेपर पासून छान रंगीबेरंगी फुल तयार केली. यामध्ये मुलांचा कागदकाम, घडीकाम, कात्री हाताळणे, चिकटकाम इ. कौशल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

# चांगला स्पर्श - वाईट स्पर्श जाणीवजागृती





सुलभक:
सौ.क्रांती करंबेळे

आमची सर्वात महत्त्वाची जबाबदारी म्हणजे आमच्या निवासी शाळेत शिक्षण घेणारी मुले-मुली सुरक्षित, आनंदी आणि चांगली राहणं. आजच्या जगात घडणाऱ्या काही घटनाच्या पार्श्वभूमीला अनुसरून, लहान वयात मुलांना योग्य आणि अयोग्य संपर्क यातील फरक शिकवणे, मुलांना चांगल्या आणि वाईट स्पर्शाची जाणीव होणं, त्यांना भविष्यात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी आत्ताच सक्षम बनविणे व संवादाच्या माध्यमातून त्यांना बोलतं करणं. यासाठी

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेत संस्था प्रमुख संतोष कांबळे यांच्या संकल्पनेतून आज "गुड टच - बॅड टच" या कार्यशाळेच आयोजन करण्यात आलं होत.

यामध्ये न्यू इंग्लिश स्कूल जावडेच्या ज्येष्ठ शिक्षिका क्रांती करंबेळे यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला व कार्यशाळेचे सुलभन केले.





# कातळशिल्प भेट...



हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी-लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेजवळ असणाऱ्या कातळगाव, जावडे ता.लांजा येथील प्रारंभिक काळातील वैशिष्ट्यपूर्ण शिल्पवैभव पाहण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. ही लेणी चौथ्या-पाचव्या शतकातील आहे. भारतीय मूर्ती कला यांमध्ये मोलाची आणि मूलभूत भर घालणाऱ्या शिल्पांचा आणि शिल्पपटाचा या ठिकाणी समावेश आहे.

विद्यार्थ्यांनी कातळात कोरलेली कातळशिल्प पाहिलीच तसेच त्यासोबत निसर्गरम्य वातावरणाचा मनमुराद आनंद लुटला. निसर्गातील फुलझाडे, भात शेती, पशु-पक्षी, गाय - बैल, तलाव, ओढा, तलाव, मातीचे प्रकार, निसर्गातील विविध रंग यांचे निरीक्षण केले. सप्तरंगी इंद्रधनुष्य देखील पहिला. विविध गाण्यांवर नृत्य करून आपला आनंद व्यक्त केला.

सायंकाळी मावळता सूर्य पाहून संस्थेने विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या बोलेरो पिकअप गाडीने प्रवासाचा आनंद घेत विद्यार्थी शाळेकडे आले. या सर्व बाबी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे त्यांच्या ज्ञानात चागली भर पडली. हा अभ्यासदौरा विद्यार्थ्यांच्या चिरकाल स्मरणात राहील.



# "अजि म्या सूर्यास्त पाहिला....! "

हेरीटेजच्या प्राथमिक आश्रमशाळा जावडेची इवली- इवलीशी लेकरं.... आज दुपारनंतर निसर्ग भ्रमंतीसाठी बाहेर पडली... आणि निसर्गाचा मनसोक्त आनंद घेता -घेता... सूर्य मावळतीकडे झुकत असताना... सर्व मुलांनी कातळावरुन सूर्यास्त पाहण्याचा क्षण अनुभवला.... समोर पसरलेलं टणक कातळ आणि त्यावरील मुलायम हिरवळ....जणू असं वाटावं की...कातळानं हिरवीकंच शाल पांघरलीय ... आणि पाठीमागे कातळावरचं तळं..... त्यातील स्वच्छ पाणी....सूर्य मावळतीकडे झुकत असताना अवघ्या नभानं ल्यालेला पिवळाजर्द शालू... सूर्याला टाटा... बाय... करण्यासाठी हवेत उंचावलेले..इवले - इवलेसे मुक्त हात.... आणि त्या साऱ्यांच्या...कातळावरील तळ्यात उमटलेल्या प्रतिकृती.... सूर्य जसंजसा मावळतीकडे जाऊ लागला.. तसतशा सर्व मुलांच्या सावल्यासुद्धा त्यांच्याशी स्पर्धा करु लागल्या.....





सूर्याचं अस्ताकडं जाणं आणि फिरुनी पुन्हा येणं.... सारा निसर्गाचा अजब खेळ.... या साऱ्या खेळाचा जावडे, ता. लांजा येथील निवासी शाळेच्या मुलांमुलींनी मनमुराद आनंद लुटला.... जसा सूर्य स्वतंत्र... तशी ही लेकरंसुद्धा स्वतंत्रच... खऱ्या स्वातंत्र्याचं हे दोन साक्षीदार... एक अवकाशातला... तर दुसरे धरतीवरचे.... आनंदी आनंदाचा हा अतिशय लोभस आणि देखणा क्षण मोबाईलच्या कमेऱ्यात टिपला आहे, प्राथमिक आश्रमशाळेचा कर्मचारी शेखर चंद्रकांत कांबळे यानं..

**शब्दांकन- संतोष कांबळे(हेरीटेज संस्थाप्रमुख)**



**ग्रामपंचायत जावडे कार्यालयास भेट**

शुक्रवार दि.३०/०८/२०२४ रोजी हेरीटेजच्या प्राथमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी जावडे गावच्या ग्रामपंचायात कार्यालयास भेट दिली. याठिकाणी ग्रामसेविका पूनम अर्जुन कुंभार यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. छोट्या खेडेगावाचा कारभार ग्रामपंचायत नावाची स्थानिक स्वराज्य संस्था पाहते. सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक ह्यांच्या मदतीने हा कारभार पाहिला जातो. पंचायतराजमधील सर्वात खालच्या पण महत्त्वाच्या टप्प्याला ग्रामपंचायत म्हणतात. हिला ग्रामसभेची कार्यकारी समिती असेही म्हणतात. गावात रस्ते बांधणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, दिवाबत्तीची सोय करणे, शिक्षण व आरोग्याच्या सोयी सुविधा पुरवणे, सार्वजनिक स्वच्छता राखणे, जन्म, मृत्यू व विवाहाची नोंद ठेवणे इत्यादी कामे ग्रामपंचायतीमार्फत केली जातात. अशी माहिती ग्रामसेवकांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी डाटा ऑपरेटर नयन संतोष पवार व श्रीकृष्ण शिंदे आदी ग्रामस्त उपस्थित होते.




# 📖 चला वाचूया, स्वत:ला घडवूया...📚









भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन राज्यभरात “वाचन प्रेरणा दिन” म्हणून साजरा केला जातो. वाचन प्रेरणा व संस्कृतीचा विकास ही एक सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. ज्ञानसंपन्न व माहितीसमृद्ध समाजाची घडण, व्यक्तिमत्त्व विकास, साहित्य विकास आणि भाषाविकास यांसाठी वाचन करणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच आमच्या

हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन “वाचन प्रेरणा दिन” म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं वाचण्यासाठी दिली होती.




# प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा , जि.रत्नागिरी संकलित मूल्यमापन १ सन २०२४-२५















शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम सत्राचा शेवटचा दिवस...विद्यार्थी दिवाळी सणानिमित्त आपापल्या घरी जाणार आहेत. त्यानिमित्ताने सत्राच्या शेवटच्या दिवशी
हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना गोड श्रीखंड पुरीचे जेवण देण्यात आले. त्याच सोबत विद्यार्थ्यांनी विविध कला सादर करून आजच्या दिवसाचा आनंद साजरा केला.

# यशोगाथा . . .



## दिपक सुरेश इंगोले

दिपक सुरेश इंगोले हा विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये वयानुरूप इयत्ता दुसरीमध्ये दाखल झाला होता. त्याला कोणत्याही प्रकारची अक्षर ओळख किवा अंक ओळख नव्हती. हेरीटेज संस्थेच्या प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेत प्रवेश घेतल्यानंतर त्याला शाळेत बसण्याची आवड निर्माण झाली. याठिकाणी त्याची तयारी करून घेऊन आता तो अंकगणित व गणितातील पायाभूत क्रीया तो अगदी सहजपणे सोडवितो.



## अनन्या निलेश कांबळे

अनन्या निलेश कांबळे ही विद्यार्थिनी इ.४ थी मध्ये शिकते. अनन्याने इ.२ री मध्ये प्राथमिक आश्रमशाळेत प्रवेश घेतला. घरच्या काही समस्यांमुळे ती वर्गात एकदम शांत बसून राहायची. अभ्यासातदेखील फारशी प्रगती दिसून येत नव्हती. शाळेत केलेल्या उपाययोजनांमुळे अनन्याचा वर्गात सक्रीय सहभाग असतो. शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देते तसेच तिला पडलेले प्रश्न शिक्षकांना विचारते. अभ्यासात देखील वाचन, लेखन व गणितीय क्रिया चांगल्या पद्धतीने करते. मित्र-मैत्रिणींना देखील अभ्यासात मदत करते.

## संजना सोमलू चव्हाण



संजना चालू वर्षी इयत्ता १ ली मध्ये शिकते. संजनाचे पालक मागील शैक्षणिक वर्षी प्राथमिक आश्रमशाळेत संजनाचा इ.१ ली मध्ये प्रवेश घेण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी शाळेत मुलां-मुलींना दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधा पहिल्या होत्या. याठिकाणच्या कर्मचाऱ्यांचे आस्थेने वागणे, मुलांची काळजी घेण्याची पद्धत इ. गोष्टी पाहून भारावले होते. परंतु संजनाचे वय इ.१ ली प्रवेशासाठी पात्र नव्हते, त्यामुळे तीचे मागीलवर्षी शाळेत प्रवेश निश्चित झाला नाही. संजनाचे पालक रस्ते बांधण्याच काम करतात, त्यांच्या राहण्याचा नक्की ठिकाणा नसतो. तरीही त्यांनी चालू वर्षी पुन्हा येऊन संजनाचा प्रवेश प्राथमिक आश्रमशाळेतच निश्चित केला.

प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा या निवासी शाळेत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण दिले जाते. मुलांचा मानसिक, बौद्धिक व शारीरिक विकास होण्याच्या दृष्टीने सर्व टीम प्रयत्न करत आहे.

# फोटो कॉर्नर...

प्राथमिक आश्रमशाळेतील विविध उपक्रम

कागदापासून होडी तयार करणे.






भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या वर्धापन दिन साजरा करताना.

प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा जावडे वर्धापन दिन










प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेतील विद्यार्थिनींनी स्वतः शाळेत राख्या तयार करून शाळेत रक्षाबंधन सण साजरा केला.



प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी केली जाते.




प्राथमिक आश्रमशाळा जावडे या निवासी शाळेत विद्यार्थ्यांचे वाढदिवस साजरे केले जातात.



शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या द्वितीय सत्रात हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेत पुढील नियोजित कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

- विद्यार्थी गुणवत्ता वाढ व विकास कार्यक्रम
- शैक्षणिक सहल
- वार्षिक स्नेह संम्मेलन कार्यक्रम
- आंतरशालेय क्रीडा दिन
- फाऊंडर डे
- परिसर भेट
- बाल आनंद मेळावा

# गरज आपल्या मदतीची...



हेरीटेज कल्चर आर्ट अँड एज्युकेशन डेव्हलपमेंट सोसायटी, रत्नागिरी- लांजा संचलित, प्राथमिक आश्रमशाळा जावडे, ता.लांजा, जि.रत्नागिरी या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आपणही आम्हाला वस्तू किंवा आर्थिक स्वरुपात मदत करू शकता. आपण केलेली मदत समाजातील गरीब व कष्टकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठीच वापरली जाईल, याची आम्ही खात्री देतो. आपण आम्हाला पुढीलपैकी तुम्हाला शक्य असेल अशी  वस्तू किंवा त्यासाठी लागणारी आर्थिक मदत करू शकता.

- विविध विषयावर आपले मार्गदर्शन
- आमच्यासाठी स्वयंसेवक म्हणून काम
- ग्रंथालयासाठी पुस्तके
- पाण्याची बॉटल
- विद्यार्थ्यांसाठी शूज
- विद्यार्थ्यांसाठी खेळणी




विद्यार्थ्यांना शालेय स्टेशनरी

- वह्या
- चित्रकला वही
- पेन
- पेन्सिल
- खोडरबर
- चित्रकलेसाठी कलर
- पट्टी
- अंकलिपी
- शालेय दप्तर

- स्मार्ट इंटरॅक्टिव्ह बोर्ड
- संगणक, प्रिंटर
- स्पिकर सेट
- नोटीस बोर्ड
- ग्रीन बोर्ड
- वॉटर फिल्टर

## - मदतीसाठी संपर्क -

**संतोष कांबळे (संस्थाप्रमुख)**
संपर्क: ९३७३३४६२१३

**लक्ष्मण मिडगुले**
संपर्क: ७२०८८७४२५३

**सोमेश्वर चव्हाण**
संपर्क: ७४९८०७२३९३

All donations to HERITAGE CULTURE ART AND EDUCATION DEVELOPMENT SOCIETY are eligible for tax exemption under Section 80G & 35 AC of Income Tax Act,1961.